मा. राज्यपालांचे सचिव कार्यालयाच्या आस्थापनेवरील आदिवासी कक्षात मानववंश शास्त्रज्ञ या पदावर श्रीमती प्राची जांभेकर यांची प्रतिनियुक्तीने नियुक्ती करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांक : राजभ-२०१९/५९५/प्र.क्र.८५/२०-अ
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २० सप्टेंबर, २०१९

वाचा :- १) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्र.आरएजे-१०११/मुमंस/प्र.क्र.५७/२०११/२०-अ, दिनांक ३१.०१.२०१२

२) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्र.आरएजे-२०१६/२३०/प्र.क्र.८९/२०-अ, दिनांक १९.०५.२०१७

३) मा. राज्यपालांचे प्रधान सचिव यांचे पत्र क्र.आस्था-रासका/शा.प्र./११/२०१९, दिनांक १३.०९.२०१९
व पत्र क्र.आस्था/रासका/शा.प्र./११/२०१९/११६४, दि.१३.०९.२०१९

प्रस्तावना:-

मा. राज्यपालांचे सचिव कार्यालयाचे आस्थापनेवर मानववंश शास्त्रज्ञ (ग्रेड वेतन रु.६६००) हे पद आदिवासी विकास कक्षासाठी निर्माण करण्यास दिनांक ३१.०१.२०१२ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली होती. त्यानंतर दिनांक १९.०५.२०१७ च्या शासन निर्णयानुसार सदर पद तात्पुरते रद्द करुन त्याऐवजी २ वर्षांसाठी रु.७५,०००/- या मानधनावर कंत्राटी पध्दतीने संशोधन अधिकारी हे पद भरण्यास मान्यता देण्यात आली होती. या दोनही पदावर सुयोग्य अधिकारी उपलब्ध होऊ शकले नाहीत. त्यामुळे मानववंश शास्त्रज्ञ हे पद पुनर्जिवित करुन प्रतिनियुक्तीने भरण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

मा. राज्यपालांचे सचिव कार्यालयाच्या आस्थापनेवरील मानववंश शास्त्रज्ञ हे पद पुनर्जिवित करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

२. श्रीमती प्राची सौरभ जांभेकर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी (महाराष्ट्र विकास सेवा), जिल्हापरिषद, अकोला यांची मा. राज्यपालांचे सचिव कार्यालयाचे आस्थापनेवरील आदिवासी विकास कक्षामधील मानववंश शास्त्रज्ञ या पदावर ३ वर्षाकरिता प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात येत आहे.

३. श्रीमती प्राची जांभेकर या पदावर कार्यरत असेपर्यंत सदर पदाची वेतनश्रेणी सहाव्या वेतन आयोगानुसार ग्रेड वेतन रु.६६००/- वरुन रु.७६००/- अशी तात्पुरती उन्नत करण्याचा देखील शासनाने निर्णय घेतला आहे.

४. श्रीमती प्राची जांभेकर यांच्या सदर पदावरील प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्ती बाबतचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

५. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक: ३०३/२०१९/व्यय-४, दिनांक १८.९.२०१९ अन्वये प्राप्त मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९२३१५१४१६४२०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Satish Karbhari Jondhale

Digitally signed by Satish Karbhari Jondhale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=GAD Protocol, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=96b5b527d7131539d3b3eb3ba523bb3514dd3d3437a78ac0f73c6d8043215729, cn=Satish Karbhari Jondhale
Date: 2019.09.23 15:18:51 +05'30'

(सतीश जोंधळे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई - ४०० ०३५.

प्रत,

१. अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई,
२. प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
३. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई / महाराष्ट्र-२, नागपूर,
४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई / महाराष्ट्र-२, नागपूर,
५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
६. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
७. वित्त विभाग/कार्यासन आपुक कक्ष / व्यय-४, मंत्रालय, मुंबई,
८. श्रीमती प्राची सौरभ जांभेकर,अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद,अकोला,
९. निवड नस्ती.